# मृत्युच्या सहवासात सहा तास...

घटना खूप जुनी! म्हणजे अगदी ऐतिहासिक नव्हे, पण मला दोन मुलींनंतर दिवस होते तेव्हाची! लग्नापूर्वी पुरोगामी माहेरी मी निखळ स्वातंत्र्य उपभोगले होते. प्रवासाची आवड निर्माण झाली होती. पण पुढच्या जीवनात हनिमून दूर, माहेराव्यतिरीक्त कुठेही जाता आले नव्हते. माहेरीही प्रकृती बरी नसली की वा सासरी बाळंतपण करण्यास कुणी तयार नव्हते म्हणून! म्हणजे त्या प्रवासात हौस-मौजेची संधी नव्हती. पुढे एखादे वर्ष बरे जाण्याची शक्यता निर्माण झाली. पुढचा काळ अनिश्चितच होता. पण नेमके मला तेव्हा दिवस राहिले होते. बाळ झाल्यावर निदान दोन-तीन वर्षे पाय बांधला जाणे स्वाभाविक होते. वर्षानंतर परिस्थिती पुन्हा जाचक होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. म्हणून मी जणू हातघाईस आले. पण...

पावसाळ्याचे दिवस! लांबचा प्रवास मजा नव्हे सजा ठरण्याची शक्यता नव्हे खात्री देता यावी असा! तरी मन उचल खात होते. वाटले - उन्हाळ्यात सारेच हिलस्टेशनवर जातात. पावसाळ्यात पर्वतराजीतील निसर्ग आगळे रुप धारण करतो. पर्वतावरून वेडे-वाकडे कोसळणारे पाणी, छोटे-मोठे ओहोळ, पावसाच्या निमित्ताने निर्माण होणारे हंगामी प्रपात.... सारे खूप छान असणार. कधी नव्हे ते मिळालेली संधी मनात हे बघण्याची इच्छा निर्माण करत होती.

पहिल्या वेळी डोहाळे पुरवण्याचा आग्रह धरता आला नव्हता. तिसरी वेळ येईतो तर डोहाळे हा शब्दच अनोळखी वाटू लागला होता. मग आता हे जमणार आहे का, हा उदास प्रश्न मनात उसळ्या मारत होता. तो निग्रहाने दडपून  सकारात्मक विचाराची कास धरत मी आसावल्या स्वरात म्हणाले, "निसर्गाचं रौद्र रुप फार बघावंसं वाटतं. एल.टि.सी. घेऊन दिल्लीहून सिमल्यास जाऊ. तुम्हाला नाही निसर्ग बघावासा वाटत?"

तोवर ते दोन मुलींचा बाप असूनही होते आज्ञाधारक लेकरू! स्वतःस काय वाटते, याचा विचार करायची त्यांना कधी संधीच मिळाली नव्हती, तर ती सवय कशी जडणार? तरी मी रंगवलेल्या सुखस्वप्नाची त्यांना भुरळ पडली. जमवल्यास आत्ताच जमेल. पावसाळा संपेतो पोट वाढलेले असेल. पुढे बाळ झाल्यावरही मोठा प्रवास जमणे कठीण! आत्ता फट सापडली आहे. पुढे परिस्थिती सुधरेल की चिघळेल, याची खात्री कोण देऊ शकणार? सहचरापाशी आणि मग आईपाशीही मी मन मोकळे केले. पावसाळ्यात मोठा प्रवास करू नये, असे त्या दोघांना वाटत होते. माझी गोची आणि परिस्थितीपुढचे हतबलपणही कळत होते. म्हणून आईने मधला मार्ग सुचवला. मुलींना तिच्याकडे ठेवून आम्ही दोघांनी जपून प्रवास करण्याचा! तिला होकार देऊन आम्ही मुलींना बडोद्यास ठेवून सिमल्यास जायचे

ठरवले.

ठरवले, असे म्हणायचे. बाकी निर्णयाचा लंबक रोज होकार-नकारात झुलत होता. हितचिंतक पावसाळ्यात जाऊ नये, हे मला पटवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. तरी माझे प्लॅनिंग जोरात चालू होते. सिद्धार्थांना नव्हता प्रवासाचा अनुभव की सांगितलेले डावलण्याची सवय! आज्ञा होईल ते नि तसेच करण्याचा संस्कार झालेल्या लेकरास स्वतःचे मत शोधायचे असते याची तोवर जाणीव झालीच नव्हती. त्यामुळे होईल ते निभावून नेण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला नव्हता. त्यांना हितचिंतकांचे म्हणणे पटत होते नि माझेही! ते निर्णयावर पोहोचू शकत नव्हते. तळ्यात मळ्यात अशा आवस्थेत नाही त्यांनी माझ्या इच्छेनुसार पूर्ण प्रवासाचे आरक्षण केले की हितचिंतकांच्या सल्ल्यानुसार बेत रहित केला. मित्र वाटावेत अशा त्यांच्या आतेभावाचे वास्तव्य लुधियाणास होते. बँकेतील विशेष ट्रेनिंगच्या काळात घट्ट मैत्र जमलेला एक मित्र अमृतसरला होता. म्हणून माझी अवघड अवस्था विचारात घेऊन त्यांनी प्रवासाचा बेत पूर्णपणे रहित न करता बडोदा लुधियाणा आणि दिल्ली बडोदा अशी डिलक्सची दोन आरक्षणे केली. त्यांचे मन स्वतंत्रपणे विचार करू लागल्याची जाणीव मला सुखवत होती. म्हणून वाटले, प्रवासास निघण्याचे नि परतीचे आरक्षण होणे पुरेसे आहे. मधल्या काळातील योजनांची आखणी प्रसंगोपात करता येईल. पावसाळ्याचे दिवस असल्याने वेकेशनसारखी गर्दी नसेल. म्हणजे आरक्षणे सहज मिळू शकतील. अशी मी आशा व्यक्त केली. मग लग्नानंतर सात वर्षांनी आमच्या स्वाऱ्यांनी पहिल्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले.

नव्हता सिद्धार्थांना प्रवासाचे प्लॅनिंग करण्याचा अनुभव की मला! पूर्वाश्रमात मी बराच प्रवास केला असला तरी त्याचा आराखडा वडीलांनी तयार केलेला असे. त्यांच्या छत्रछायेखाली सारे नीट पार पडत असे. दोन अननुभवी व्यक्ती प्रवासास निघाल्या तर थोडा गोंधळ होणे अपेक्षित होते नि त्याचा सामना करायची माझ्या मनाची तयारीही होती.  पहिल्या प्रवासाचा थरार आम्हाला सुखवत होता. लुधियाणाचा मुक्काम अपेक्षेपेक्षा सुखद रीतीने पार पडला. अमृतसरचे आरक्षण सहज मिळाले. तिथून सिमल्यास जायचा विचार होता. पण अमृतसरला पोहोचेतो सिमल्यास तीन दिवस संततधार लागली. सिमल्याचे सारे रस्ते बंद झाले. कधी नव्हे ती कोंडवाड्याबाहेर पडण्याची संधी मिळाली नि ती वर अक्षरशः पाणी फिरले. मी खट्टू झाले. माझा हिरमोड सिद्धार्थांना उमजला. घराबाहेर पडताच त्यांचे विचारचक्र फिरू लागले होते. सिमला नाही तर दुसरे काही पदरात पाडून घेता आले तर बघावे, असा विचार करून त्यांनी मित्राच्या कुटुंबियांशी संवाद साधला.

“इथून डलहौसीला जाण्यासाठी आरामगाड्या आहेत.” मित्राची आई सांगू लागली, “तिथे बहुला प्रसन्न वाटेल. फार श्रमही होणार नाहीत”

आम्ही दोघांनी एकमेकांकडे बघितले. तोवर डलहौसी हा शब्द आम्ही केवळ इतिहासाच्या पानांवरच वाचला होता. भारतीयांवर अपार जुलूम करणारा व्हाइसरॉय, हीच आमच्या मनात त्याची ओळख होती. त्याच्या नावाचे अत्यंत सुंदर हिल स्टेशन निर्माण केले आहे, याची आम्हाला गंधवार्ता नव्हती. त्याकाळी या हिलस्टेशनचा बोलबाला झाला नव्हता, हे ही खरे! त्यामुळे आम्ही गोंधळणे स्वाभाविक ठरवून मित्राच्या वडीलांनी आम्हाला सविस्तर माहिती दिली.

ख्यातकीर्त जे. कृष्णमूर्ती यांचा डलहौसीत एक आश्रम होता, माऊंट आबू येथे वास्तव्य असलेल्या तत्वचिंतक आणि जे. कृष्णमूर्ती यांच्या शिष्या असलेल्या श्रीमती विमला ठकार यांचे ते आवडते विश्रांतीस्थान आहे, असेही त्यांनी सांगितले. सिमला, दार्जीलिंग वगैरे प्रसिद्ध स्थळी पर्यटकांची झुंबड उडते. त्यामुळे तिथल्या निसर्गदत्त सौंदर्यास शहरी सवंगपण ग्रासू लागले आहे. डलहौसी मात्र विख्यात नसल्याने तिथले निसर्गदत्त सौंदर्य अक्षत राहिले आहे. शिवाय ते छोटे असल्याने ते बघण्यास दोन दिवस पुरतील. मित्राच्या वडीलांनी सारे आवर्जून सांगितले.

मला ते पटले. वाटले 'सिमल्यास सारी जातात. आपण नव्या नवलाईचे स्थान बघावे.' मुख्य म्हजे ते सहज पदरात पडणार होते. म्हणून आम्ही तिथे जायचे ठरवले. धावत पळत दोन दिवसात न परतता चार दिवस राहावे, असे मला वाटले. सिद्धार्थांनी माझे मन राखण्याची संधी उपटली. लगेच ते उठलेच. लगेच त्यांनी अमृतसर डलहौसीची दोन्ही वेळची आरामगाडीची तिकिटे आरक्षित केली. लगोलग स्टेशनवर जाऊन ते अमृतसर दिल्लीच्या प्रवासाचे आरक्षण करून मोकळे झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही डलहौसीच्या मार्गास लागलोही!

डलहौसीचा निसर्ग खरोखर मन प्रसन्न करणारा होता. धुक्याच्या पांघरुणात लपेटलेल्या या सुंदर आणि सुबक स्थानाने आम्हाला अनिर्वचनीय आनंद दिला. कधी नव्हे त्या मिळालेल्या संधीचा आम्ही मनसोक्त आनंद लुटत होतो. डलहौसी टिकली एव्हढे हिलस्टेशन! आम्हाला रोज पायी नगरप्रदक्षिणा करता यावी असे! या ठिकाणी औपचारिक प्रेक्षणीय स्थळे फारशी नाहीत. पण समस्त आसमंत प्रेक्षणीय! निसर्गाची अनोखी प्रेक्षणीयता अवघ्या दोन डोळ्यात कशी सामावायची, असा प्रश्न पाडणारा! देहभर डोळे असावेत असे वाटायला लावणारा! निसर्गाचे ते भव्य दिव्य आणि उदात्त स्वरुप बघताना खरोखर डोळ्यांचे पारणे फिटले. जिकडे नजर फिरवावी तिकडचा निसर्ग रम्य वाटत होता. होता म्हणण्याचे कारण असे की आता डलहौसीची ख्यातीही सर्वदूर पोहोचली आहे. त्यामुळे डलहौसीची स्थिती इतर विख्यात स्थळांपेक्षा वेगळी नाही. सुखसोयींच्या नावाखाली शहरी सवंगपणा वाढला आहे. तर ते असो.

चार दिवस आम्ही निसर्गाच्या अद्भूत सौंदर्याचे मनसोक्त रसपान केले. तृप्त मनाने परतीच्या

मार्गास लागलो. मला आजही खिडकीजवळ जागा हवीशी वाटते. तारुण्यात तर खूळ म्हणण्याजोगे जबरदस्त आकर्षण होते. अर्थात मी खिडकी पकडली. आरामगाडी पुढे सरकू लागली. हिमालयाच्या वेड्या वाकड्या रांगातून! हा प्रवासही पर्यटनाचा अनोखा हिस्सा असतो. वर्षाऋतू मस्त वाटत होता. हिरव्याकंच वातावरणात साक्षात पाऊस सुरू झाला. खिडकीतून अंगावर येणारे तुषार अंगभर शहारा फुलवत होते. आरामगाडी आरामात वळणे घेत धीम्या गतीने पुढे सरकत होती. सामान्यतः मला बस 'लागत' नाही. तरी कदाचित पोटात बाळ असल्याने मला मळमळू लागले. आवळा सुपारीस वेठीस धरून मिळालेल्या - नव्हे मिळवलेल्या प्रत्येक क्षणाचा मी आसुसून उपभोग घेत होते. तीन-साडेतीन तास! आम्ही प्रवासानंदात डुंबत असताना अचानक एका विपरीत वळणार बस थांबली. पुढे थोडी वाहने थांबलेली दिसली. बसमध्ये 'काय झाले' 'का बस थांबली?' असा कालवा सुरु झाला.

चढण असलेल्या वळणावर बस अचानक थांबवावी लागली होती. बसचालक (ड्रायव्हर) अत्यंत सावध होता. तो किंचितही गाफिल झाला तर बस दरीत कोसळण्याचे भय होते. त्यात पावसाचा जोर वाढला. थोड्या अंतरावर दरड कोसळत होती. अविरत दगड, धोंडे आणि माती कोसळत होती. ती बसचालकाच्या सतर्कतेवर पाणी फिरवील काय, हा प्रश्न काळजाचा ठोका चुकवत होता. पावसाचा जोर वाढत होता. हिमालय हा अत्यंत ठिसुळ पर्वत आहे, असे शालेय जीवनात शिकले होते. त्याचा मथितार्थ आता कळत होता. कोसळणाऱ्या खडकांबरोबर पावसामुळे तयार झालेल्या हंगामी प्रपातांचे पाणी आडवे तिडवे खाली कोसळत होते. तिथल्या मातीचा रंग लाल! त्यामुळे हे पाणी रक्तासारखे भेसूर दिसत होते. बसच्या टपावर आणि चहू बाजूस छोट्या-मोठ्या दगडांचा वर्षाव चालू होता. टपावर होणारा टणाटण आवाज आणि खिडकीच्या काचा फुटण्याची शक्यता मनात दहशत निर्माण करत होती. गर्भवती पत्नीस रक्षण पुरवण्यासाठी सिद्धार्त खिडकीपाशी बसण्यास तयार झाले. पण पोटातील बाळाच्या हालचाली वाढल्या होत्या. त्यामुळे मला उलट्या सुरू झाल्या. खाली उतरणे शक्य नव्हते. म्हणजे मी खिडकीशी बसण्यास पर्याय नव्हता.

आकर्षक वाटणारी खिडकीपासची जागा, निसर्गाचे भयप्रद रूप सादर करत वाकुल्या दाखवत होती. या अवस्थेत किती काळ कंठावा लागेल, ते सांगता येत नव्हते. कोसळणाऱ्या दरडींच्या खडकांमुळे बंद झालेला मार्ग मोकळा करण्यासाठी आर्मीचे लोक झटत होते. ते प्रामाणिकपणे खडक दूर करण्याचे काम वेगाने करत होते. पण नवे खडक कोसळतच होते. त्यांना थोपवणे कुणाच्या क्षमतेत बसणार नव्हते. प्रत्येक क्षण युगासारखा लांबलचक वाटत होता. उलट्यांमुळे पोट रिकामे झाले नि रिकाम्या पोटात भुकेचा डोंब उसळला. मुले बरोबर असलेले लोक खाण्यापिण्याची व्यवस्था जवळ ठेवतात. आम्ही दोघेच प्रवास करत होतो. रस्त्यात मिळेल त्यावर मजेत निभावून नेण्याचा विचार ओठी आणून सिद्धार्थांनी आयुष्यात प्रथमच 'आवारागर्दी' करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मीही तेव्हा गालात हसत 'आज्ञाधारक बाळ बिघडायला लागलं!' असे म्हणत त्यांची चेष्टा केली होती. अर्थात

त्यांची इच्छा आनंदाने उचलूनही धरली होती. पण त्यामुळे रिकाम्या पोटात उसळलेल्या भुकेच्या आगीवर ओतायला आमच्याकडे पाणीही नव्हते. माझे ओकणे बघून आसपासच्या प्रवाशातील बुजुर्ग लोकांना अनेकानेक उपाय सुचवण्याची उबळ येत होती. कुणी 'अशा' अवस्थेत पत्नीला प्रवास करायला लावणाऱ्या (?) सिद्धार्थांची कानउघडणीही करत होते. त्यांना उलटून बोलण्याची सवय नव्हती. म्हणून विषय वाढत नव्हता. बुजुर्ग स्त्रिया मलाही देवावर हवाला ठेऊन जप करण्याचा सल्ला देत होत्या. जप कसा करायचा, ते ठाऊक नसलेल्या पाखंडी अज्ञानी स्त्रिला ज्ञानदान करण्यासाठी काहींच्यात चढाओढ लागली होती.

परीसर उत्तर दिशेचा असल्याने बसमध्ये पंजाबी लोक अधिक होते. खणखणीत स्वरात ते 'आई बलाको टाल तू… '. म्हणत देवाला गदागदा हलवण्याचा प्रयत्न करत होते. त्या तारसप्तकातील उद्घोषात काहींचे 'जय मातादी' हे नारे मिसळत होते. विविध प्रकारच्या देवांच्या नावाने इतकी बोंब उठत होती की आपण हिलस्टेशनवर गेलो होतो की यात्रेला, असा प्रश्न पडावा! त्या कोलाहलात जीव अधिकच घाबराघुबरा होत होता. वेळ पुढे सरकतच नाहीय, असे वाटत होते. बस थांबल्याला खूप युगे लोटली, असे वाटत असताना घड्याळाचे काटे अवघे दोन घरे पुढे सरकले होते. सेकंदकाट्याने जणू तास काट्याची गती धारण केली होती.

पोटात उसळलेला भुकेचा डोंब आणि बाळाची लाथाळी डावलून मला सारख्या मुली आठवत होत्या. अजून शाळेत जाऊ न लागलेल्या! आजोळी आजी, आजोबा, मामा, मामी सगळ्यांच्या लाडात नाहून निघत असलेल्या! या कौतुकाच्या नाती उद्या अनाथ ठरतील? हा प्रश्न मनात दाटला नि मी शहारले. मनाचा थरकाप उडत होता. आई झाल्यावर मी साहसाच्या नि प्रवासाच्या हौशीला तिलांजली देणे योग्य ठरवायला हवे होते, हा विचार मनात अपराधी भावनेस उधाण आणत होता. माझीच मी मिटून जात होते. साऱ्या हितचिंतकांनी मला प्रवास करू नये, असा सल्ला दिला होता. सिद्धार्थही नको म्हणत होते. तरी मी त्यांना भरीस घातले. हे वास्तव माझे काळीज कुरतडत होते. मी मुलींवर अनाथपण लादल्याची कल्पना मला सैरभैर करत होती. पार ढेपाळले होते मी! अत्यंत हळवी झाले होते. मनात सातत्याने देवाचा नव्हे तर मुलींचा जप होत होता. कधी न दिसलेल्या देवाच्या प्रार्थनेचे नव्हे तर शालेय जीवनातील एका कवितेचे बोल मनात रुंजी घालत होते….

मृत्यू ते जन बाहतात परि ते भोगास वैतागुनी
मृत्यो येऊ नको असे विनवीती सारे परंतू मनी
आहे मीही सुपातलाच कण त्या, जाते न ज्याते टळे,
मृत्युला म्हणतो सबूर परि ते ना स्वार्थ वृत्तीमुळे…..

पिलाच्या चोचीत चारा भरवणाऱ्या चिमणीस पाहून कवीला गलबलून येत होते नि त्याचसाठी तो

मृत्यूस सबुरीची कळकळीने विनंती करत होता, याचे हृदयस्पर्शी वर्णन त्या कवितेत होते. मी तरी वेगळे काय करत होते?

वाऱ्या-पावसाच्या माऱ्यात पर्वतावरून दगड आणि माती कोसळण्याचा वेग वाढत होता. मुलींच्या आठवणीने गळ्यात आवंढ्यांची माळ अडकत होती. पोटातले बाळ जोरजोरात ढुशा मारत होते. सारे असह्य होऊन मी गप्पकन् डोळे मिटले. अंगास पावसाळी गारवा झोंबत होता. अभद्र कल्पनेतही देह थरथरत होता. सिद्धार्थांची अस्वस्थपणे भिरभिरणारी नजर तेव्हाच नेमकी माझ्यावर स्थिरावली. डोळे मिटून थरथरणाऱ्या मला चुचकारत ते मिश्किल स्वरात म्हणाले, "तुला निसर्गाचं रौद्ररुप बघायचे डोहाळे लागले, म्हणून आपण निघालोय नं? कधी नव्हे ते मी डोहाळे पुरवण्याचं मनावर घेतलंय नि तू डोळे मिटून हे तांडव बघणार?" आसपासच्या लोकांचे भान विसरून मी त्यांना घट्ट मिठी मारली. डोळ्यांना अश्रुधार लागली. मी हुंदके देत कळवळून बोलू लागले
"वर्षा स्वाती आपल्याला नि आपण त्यांना दिसू नं हो? माझ्या मूर्खपणापायी पोरी उद्या.... "
"गप गं!" मला अभद्र वाक्य पूर्ण करण्याची संधी न देता त्यांनी माझ्या ओठांवर हात ठेवला. आश्वासक स्वरात ते म्हणाले, "आपण स्वप्नातही कुणाचं वाईट केलं नाहीय की चिंतलंही नाहीय. आपलं काहीही वाईट होणार नाही, याविषयी खात्री बाळग. इतके दगड-धोंडे कोसळतायत तरी बसचा एकही काच फुटला नाहीय, ते बघ. तांडव बघण्याचा विचार सोड नि डोळे मिट बरं! झोप लागली तर भूक जाणवणार नाही नि इतकं उद्ध्वस्तही वाटणार नाही!"

प्रतिगामी संयुक्त कुटुंबात राहिलेल्या त्यांना, अनोळखी समाजात वावरतानाही माझा अनाहूत स्पर्श टाळण्याची सवय आहे. म्हणून कधी नापसंतीने तर काही अंशी टोमणा मारल्यागत मी त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणते. त्याच सिद्धार्थांच्या मिठीत मी भर बसमध्ये अनावर हुंदके देत होते. तरी विरोध न करता उलट किंचित अधिक जवळ घेऊन ते मला थोपटू लागले. हळुवार स्वरात काही गुणगुणू लागले. वास्तविक गाण्यासाठी त्यांचा आवाज अजिबात योग्य नाही. सूर आणि बेसूर यातला तोल न सांभाळणारा नवरा भसाड्या आवाजात गाऊ लागला की मी त्याला असूर ही पदवी प्रदान करते. तरी त्यांची गुणगुण थांबवण्याची भुणभूण न लावता मी त्यांच्या मिठीत हुंदके देत राहिले. कितीतरी वेळ!!!

"बाहेर बघ, काय मस्त दिसतंय गं!" सिद्धार्थ माझ्या कानात गुणगुणले. मी डोळे उघडले. बाहेर बघितले तर बस मंद गतीने पुढे सरकत होती. मी चमकून घड्याळात बघितले. क्षणार्धात (?) तासकाटा तीन घरे पुढे सरकलेला दिसला. विश्वास न बसल्यागत मी डोळे चोळून पुन्हा बघितले. नकळत माझ्या ओठी मंद स्मित फुलले.

पाऊस पडतच होता. पण आता त्याचा जोर ओसरला होता. पर्वतशिखरांवरून पाणी वेडे-वाकडे

कोसळतच होते. पण आता प्रवाहाचा रोरावता आवाज भयप्रद उरला नव्हता. लाल माती घेऊन कोसळणाऱ्या जलधारा रक्तप्रवाहासारख्या भेसूरही वाटत नव्हत्या. खरोखर निसर्गाचे रौद्र स्वरुप बघताना डोळ्याचे पारणे फिटत होते. माझ्या खुळ्या इच्छेस मान देऊन माझ्या संगती आलेल्या सहचराकडे मी अनिमिष नजरेने बघत राहिले.
"इथं तू मला बघायला आली आहेस की निसर्गाचं रौद्र रूप बघायला?" माझे नाक चिमटीत धरून खेचत ह्यांनी विचारले. त्यांचा इतका स्वच्छ, नितळ आणि बिनधास्त सूर मी कधी ऐकला नव्हता. ते बोलतच होते, "थोडी झोप लागल्यानं आता तजेला वाटतोय नं? समोर बघ. शब्दांच्या पलिकडं जाऊन निसर्ग आपल्यासमोर भयंकर सुंदर म्हणजे काय, याचा अर्थ आपल्याला उलगडून दाखवतोय."

निसर्गाच्या त्या रौद्र भीषण रुपाला मी मनपासून वंदन केले. काळजीचे, असुरक्षिततेचे ढग आता दूर सरले होते. मृत्युच्या सहवासातला सहा तासांचा भयव्याप्त काळ संपला होता. उशीर झाला असला तरी आम्ही सुखरुप अमृतसरला पोहोचणार होतो. मग दिल्ली गाठणार होतो. दिल्लीहून मुलींसाठी छान छान खरीदी करणार होतो. वेळेवर मुलींना घ्यायला बडोद्यास जाणार होतो. दिल्लीची खरीदी बघताना मुलींच्या चिमण्या चेहऱ्यावर उमटणारे निरागस हास्य नि समाधान पाहून तृप्त होणार होतो. आपली छोटीशी दुनिया सुरक्षित राहिल्याचा आनंद आमच्या मनात मावत नव्हता. आनंदाश्रुंच्या रुपाने तो डोळ्यातून गालावर ओघळत होता.

**- स्मिता भागवत**